# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

MERC/ADM/RTI/055/2021/**0560** Dt. 21.12.2021

प्रति,
श्री. अमर अशोक डोके,
B-३०२, लोकमंगल ऑक्सी पार्क,
मुरारजी पेठ, उमानगरी, सोलापूर -४१३००१

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. १६.११.२०२१ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. २३.११.२०२१ रोजी प्राप्त झालेला आहे. त्यानुसार, आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | मी मा. लोकपाल ऊर्जा विभाग यांच्याविरूध्द दि.२०.०९.२०२१ रोजी दिलेला तक्रारी अर्ज मारूती कुरीयर याद्वारे आपणाकडे दिलेला होता. सदर अर्जावर आपणाकडून करण्यात आलेले आदेश व कार्यवाही रिपोर्ट याची प्रत मिळावी. | याबाबतची माहिती उपलब्ध नाही. |
| २ | आपणाकडे लोकपालविरूध्द आलेल्या तक्रारीवर आपणाकडून कोणत्या नियमावलीनुसार व पध्दतीनुसार चौकशी करण्यात येते त्याच्या सही शिक्याची नक्कल. | आपणांस आवश्यक असलेली माहिती महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० मध्ये उपलब्ध आहे ** |
| ३ | माझ्या तक्रारी अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर रिपोर्टची प्रत. | याबाबतची माहिती उपलब्ध नाही. |
| ४ | लोकपालाच्या आदेशाविरूध्द कोणत्या तरतुदीनुसार अपील करता येते त्या तरतुदीची लिखीत माहिती. | आपण विचारलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरूपाची आहे तसेच सदर कायदा हा काल्पानिक प्रश्न उपस्थित करण्याची किंवा जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नांची उत्तरे शोधून देणे अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियम, २००५ २(च) नुसार माहिती मागावी जेणेकरून आपणास जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती उपलब्ध करून देणे सोयीचे होईल. *** |

** वरील विनियम आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

**Please note that above Regulations and details is available in public domain on the Commission website in downloadable format on www.merc.gov.in. As per the Hon'ble CIC decision No. CIC/YA/A/2014/000379/SB Dated 19.09.2016 in the matter of Shri. K. Lall Vs M. K. Bagri, Assistant Registrar of Companies and CPIO, Appeal No. CIC/AT/A/2007/00112, dated 12.04.2007, since the same is available in public domain, the PIO is not obliged to provide the same to the appellant under the RTI Act.

**OR**

सदर विनियमाच्या छायांकित प्रती आपणांस हव्या असल्यास माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार पुढीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची छायांकित प्रतीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकूण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | **एकूण रु.** |
|---|---|---|---|---|
| ४७ | २ | ९४ | अंदाजे रू. १००/- | १९४/- |

** वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क (रु. १९४/-) आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा आपल्या प्रतिनिधीद्वारे रोख रक्कम रू. **९४/-** जमा करुन शुल्क भरल्याची पावती /चलन पुरावा सत्य प्रत समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील.

**Bank details are as under:**

| | | |
|---|---|---|
| Bank Name | : | State Bank of India |
| Account No. | : | 30192810455 |
| Branch | : | Cuffe Parade, Mumbai – 400 005. |
| IFSC Code | : | SBIN0005345 |

*** माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रकरण 1 मधील 2 (च) नुसार "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री अनिलकुमार उके, संचालक (विधी) प्रभारी /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४ / ६५/ ६९ **Email:** anilkumar.ukey@merc.gov.in

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी